साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

संपादक : विशाल वामन पाटील

पोस्ट परवाना :
KRDDN/026/2026-28

HELLO NEWS

* सातारा * वर्ष १ * अंक १५ * मराठी * सोमवार ७ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २०२६ * PRGI. MHMAR/26/A3624 * पाने ४ * किंमत ३ रुपये

* Satara * Year 1 * Volume 15 * Marathi * Monday 7 September to 13 September 2026 * PRGI. MHMAR/26/A3624 * Page 4 * Price 3 Rs.

## कुस्तीपटू अश्विनी पौळ यांची ३ मुलांना घेऊन नळदुर्ग किल्ल्यावरुन उडी

**सोलापूर (हॅलो न्यूज)**

धाराशिवमधून एक अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. राष्ट्रीय स्तरावरील महिला कुस्तीपटू अश्विनी पौळ यांनी आपल्या तीन लहान मुलांसह ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्यावरून १०० फूट खोल दरीत उडी घेतली आहे. या थरकाप उडवणाऱ्या घटनेत कुस्तीपटू अश्विनी पौळ आणि त्यांचा साडेपाच वर्षांचा मुलगा अजिंक्य यांचा जागीच मृत्यू झाला. तर अडीच वर्षांच्या जुळ्या मुलींपैकी क्रांती नावाच्या चिमुरडीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच जुळ्या मुलींपैकी दुसरी मुलगी वीरा ही गंभीर जखमी असून, तिच्यावर धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात व्हेंटिलेटरवर उपचार सुरू आहेत.



अश्विनी पौळ यांनी आपल्या तीन मुलांसह नळदुर्ग किल्ल्यावरून १०० फूट दरीत त्यांनी उडी घेतली. या घटनेत अश्विनी पौळ आणि त्यांचा साडेपाच वर्षांचा मुलगा अजिंक्य यांचा जागीच मृत्यू झाला. तर अडीच वर्षांच्या दुसऱ्या मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आणि एका मुलीवर धाराशिव येथे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अश्विनी पौळ यांनी मुलांना घेऊन आत्महत्याचं पाऊल उचललेल्या या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र आणि क्रीडा जगतातून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. पती आणि सासरच्या मंडळींच्या सततच्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळूनच मुलीने आत्महत्या केल्याचा अश्विनी यांच्या वडिलांनी गंभीर आरोप केला आहे.

## कृष्णा सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार जाहीर

### महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्स फेडरेशनकडून घोषणा; १२ सप्टेंबरला होणार वितरण

**कराड (हॅलो न्यूज)**

ग्रामीण अर्थकारणाला चालना देत जनसामान्यांना भक्कम आर्थिक आधार देणाऱ्या, कृष्णा सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ट बँकेचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनकडून या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, १२ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.



राज्यातील सहकारी नागरी बँकांचा महासंघ असलेल्या दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनकडून दरवर्षी सहकारी बँकिंग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकांच्या कार्याची दखल घेत, सर्वोत्कृष्ट बँक पुरस्काराने त्यांचा गौरव केला जातो. सन २०२५-२६ या वर्षासाठी कृष्णा सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ट बँकेचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. ५०१ कोटींपेक्षा अधिक आणि १००० कोटींपर्यंत ठेवी असलेल्या बँकांच्या गटातून कृष्णा बँकेची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

कृष्णा सहकारी बँकेने चेअरमन आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या नेतृत्वाखाली मोठा विस्तार केला आहे. बँकेने सातत्याने नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत, ग्राहकांना मोबाईल बँकींगसारख्या अत्याधुनिक सोयी उपलब्ध करुन देत ग्राहकहित जपले आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे अशा ४ जिल्ह्यात २७ शाखा व १ विस्तारीत कक्षाच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या कृष्णा बँकेला नुकतीच रिझर्व्ह बँकेकडून ठाणे, सोलापूर व रत्नागिरी जिल्ह्यात कार्यविस्तारास मंजुरी मिळाली आहे. ग्राहक सेवा, आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा योग्य वापर या चतु:सुत्रीचा अवलंब करत कृष्णा बँक आपल्या ग्राहकांना उत्तम सेवा देत आहे.

या पुरस्काराचे वितरण १२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील सुंदरवाडी परिसरातील ङ्गएक्सप्रेस इन हेरिटेजफ येथे होणार आहे. या पुरस्कारामुळे कृष्णा बँकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, याबद्दल बँकेचे सर्व सभासद, संचालक मंडळ, ग्राहक, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## कराड अर्बन बँकेला ‘सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार’ जाहीर

**कराड (हॅलो न्यूज)**

सहकारी बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीचा ठसा उमटवणाऱ्या दि कराड अर्बन को- ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड कराड (शेड्युल्ड बँक) यांना दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशन लिमिटेड यांच्या वतीने दिला जाणारा सन २०२५-२६ चा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार जाहीर झाला आहे. बँकेला सलग दुसऱ्या वर्षी हा बहुमान मिळत असल्याने बँकेच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



**१२ सप्टेंबरला पुरस्कार वितरण**

कराड अर्बन बँकेने सहकार क्षेत्रात सातत्यपूर्ण प्रगती करत ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. सुमारे २५०१ कोटी रुपयांच्या ठेवी आणि ५००० कोटी रुपयांपेक्षा अधिक व्यवसायाचा टप्पा गाठलेल्या या बँकेला राज्य पातळीवर तृतीय क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे. सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य, बँकेची प्रगती, सभासद व ग्राहकांचा दृढ विश्वास या बाबींची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशन लिमिटेड यांच्या वतीने देण्यात येणारा ङ्गसर्वोत्कृष्ट बँक पुरस्कारफ हा सहकार क्षेत्रातील महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा सन्मान मानला जातो. त्यामुळे कराड अर्बन बँकेला मिळालेल्या या पुरस्कारामुळे बँकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**कुशल नेतृत्व आणि सांघिक प्रयत्नांचे यश**

बँकेचे अध्यक्ष समीर जोशी, उपाध्यक्ष शशांक पालकर, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल लोहोटी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी सीए धनंजय शिंगटे यांच्या नियोजनबद्ध वाटचालीमुळे बँकेने प्रगतीचा आलेख कायम राखला आहे. तसेच कुटुंबप्रमुख सुभाषराव जोशी, बँकेचे माजी अध्यक्ष डॉ. सुभाष एरम यांच्या मार्गदर्शनामुळे बँकेने नवनवीन क्षेत्रात आपला विस्तार केला आहे.

बँकेने शेवटच्या सात महिन्यात ७५० कोटी रुपयांच्या व्यवसायाचा ऐतिहासिक टप्पा पार केला आहे. बँकेचे सभासद, ग्राहक, हितचिंतक, संचालक मंडळ आणि सेवक वर्ग यांच्या एकत्रित योगदानामुळे हा पुरस्कार प्राप्त झाल्याची भावना बँकेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

**संभाजीनगरला १२ सप्टेंबरला सन्मान**

कराड अर्बन बँकेचा दि. १२ सप्टेंबरला पुरस्काराने सन्मान होणार आहे. दुपारी २ वाजता वाजता एक्सप्रेस इन हेरिटेज, जालना रोड, केंब्रिज स्कूलच्या समोर, सुंदरवाडी छत्रपती संभाजीनगर येथे होणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी सीए धनंजय शिंगटे यांनी दिली.

## सर्व धर्मीय सण-उत्सवांमध्ये ध्वनीप्रदूषणाला आळा घाला; कायद्याची समान आणि कठोर अंमलबजावणी करा; महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मागणी

**विशाल वामन पाटील (जागर)**

सण, उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि सार्वजनिक समारंभ हे समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग आहेत. प्रत्येक नागरिकाला आपला धर्म, श्रद्धा आणि परंपरा पाळण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र हे स्वातंत्र्य इतर नागरिकांच्या आरोग्य, शांतता आणि जगण्याच्या अधिकारावर अतिक्रमण करणारे असू शकत नाही. त्यामुळे सर्व धर्मीय सण-उत्सव, मिरवणुका, धार्मिक स्थळे तसेच सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी कायद्याची समान, पारदर्शक आणि कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी भूमिका महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (महाराष्ट्र अनिस) मांडत आहे.

भारतामध्ये Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 लागू आहेत. त्यानुसार निवासी क्षेत्रासाठी दिवसा (सकाळी ६ ते रात्री १०) ध्वनीची मर्यादा ५५ डेसिबल आणि रात्री (१० ते सकाळी ६) ४५ डेसिबल आहे. शांतता क्षेत्रासाठी ही मर्यादा अनुक्रमे ५० आणि ४० डेसिबल आहे. नियमांनुसार लाऊडस्पीकर किंवा सार्वजनिक ध्वनिवर्धक यंत्रणा वापरण्यासाठी पूर्वपरवानगी आवश्यक आहे आणि रात्रीच्या वेळेत त्याच्या वापरावर स्पष्ट निर्बंध आहेत.

**(जागर..)**

विशेषत: डॉल्बी, मोठ्या क्षमतेच्या साउंड सिस्टीम किंवा डीजेच्या नावाखाली कायदेशीर ध्वनीमर्यादेपेक्षा मोठ्या आवाजात ध्वनीप्रक्षेपण करण्यास कोणतीही मुभा नाही. एखाद्या यंत्रणेचे नाव डॉल्बी किंवा डीजे असणे हा मुद्दा नसून, त्या यंत्रणेतून निर्माण होणारा आवाज कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेत आहे की नाही, हा महत्त्वाचा निकष आहे. सार्वजनिक ठिकाणी लाऊडस्पीकर वापरण्यास लेखी परवानगी आवश्यक असल्याचे मुंबई उच्च न्यायालयानेही स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र अनिसने गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरणपूरक गणपती आणि पर्यावरणपूरक दिवाळी यांसारख्या उपक्रमांतून सण साजरे करण्याची संस्कृती अधिक संवेदनशील, विवेकी आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी जनजागृती केली आहे. पर्यावरणपूरक सण म्हणजे केवळ प्रदूषण कमी करणे नव्हे; तर मानवी आरोग्य, प्राणी-पक्षी, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि आजारी व्यक्ती यांचा विचार करून उत्सव साजरा करणे होय. ध्वनीप्रदूषण हा देखील पर्यावरणीय आणि सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न आहे.

महाराष्ट्र अनिसची भूमिका कोणत्याही एका धर्माच्या किंवा विशिष्ट उत्सवाच्या विरोधात नाही. गणेशोत्सव असो, नवरात्र असो, ईद असो, मोहरम असो, ख्रिसमस असो, गुरुपर्व असो किंवा अन्य कोणताही धार्मिक अथवा सांस्कृतिक कार्यक्रम असोकायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. मुंबई उच्च न्यायालयानेही ध्वनीप्रदूषणासंदर्भातील निर्देश सर्व धर्म आणि सर्व पंथांच्या सण-समारंभांना लागू असल्याचे स्पष्ट केले आहे अशी माहिती महाराष्ट्र अंनिस मार्फत डॉ. हमीद दाभोलकर, उदय चव्हाण, दीपक माने वंदना माने भगवान रणदिवे प्रकाश खटावकर शंकर कणसे मोहसीन शेख प्रमोदिनी मंडपे यांनी केली आहे.

**महाराष्ट्र अंनिस प्रमुख मागण्या**

सर्व धर्मीय सण-उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये Noise Pollution Rules, 2000 ची काटेकोर अंमलबजावणी करावी.

लाऊडस्पीकर, डीजे, डॉल्बी किंवा अन्य ध्वनिवर्धक यंत्रणांना पूर्वपरवानगी आणि निर्धारित डेसिबल मर्यादेचे पालन अनिवार्य करावे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळे, आयोजक, ध्वनियंत्रणा चालक आणि संबंधित जबाबदार व्यक्तींवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी.

नागरिकांच्या तक्रारींवर पोलिस व संबंधित प्रशासनाने त्वरित घटनास्थळी जाऊन ध्वनीची पातळी मोजावी आणि बेकायदेशीर ध्वनिवर्धक तत्काळ बंद करावेत.

न्यायालयीन निर्देशांमध्येही तक्रारीवर त्वरित कारवाई आणि ध्वनीपातळीची नोंद करण्यावर भर देण्यात आला आहे.

संपादकीय

# पक्षांतर बंदी कायदा कठोर करायला हवा!

जो पक्षांतरबंदी कायदा घोडेबाजार रोखण्यासाठी जन्माला आला, तोच कायदा आज घोडेबाजाराला घटनात्मक संरक्षण देणारे कवच बनला आहे, ही शोकांतिका आहे. ती लक्षात घेता पक्षांतर बंदी कायदा अधिक कठोर करायला हवा. भारतीय लोकशाहीने गेल्या चाळीस वर्षांत एक कायदा वारंवार वाकवला, मोडला आणि पुन्हा जोडला आहे, तो म्हणजे पक्षांतरबंदी कायदा. १९८५ साली राजीव गांधी सरकारने ५२ व्या घटनादुरुस्तीद्वारे राज्यघटनेत दहावे परिशिष्ट जोडले आणि कलम १०२ व १९१ अन्वये पक्षांतर करणाऱ्या खासदार व आमदारांना अपात्र ठरवण्याची तरतूद केली. १९६७ ते १९७२ या पाच वर्षांत लोकसभा आणि सर्व विधानसभा मिळून सुमारे चार हजार सदस्यांपैकी जवळपास दोन हजार सदस्यांनी पक्ष बदलले होते, यातील काहींनी तर पाच वेळा पक्ष बदलला होता. हा आकडाच सांगतो की भारतीय संसदीय लोकशाहीत घोडेबाजार किती खोलवर रुजला होता. मात्र चाळीस वर्षांनंतरही हा कायदा त्याच्या मूळ उद्दिष्टापासून किती दूर गेला आहे, हे महाराष्ट्राने गेल्या तीन वर्षांत जगाला दाखवून दिले. शिवसेना फुटली, राष्ट्रवादी काँग्रेस फुटली आणि दोन्ही वेळच्या निकालांनी कायद्याच्या मूळ हेतूलाच सुरुंग लावला. यामागचे मूळ कारण एकच आहे, या कायद्यात शिक्षा इतकी सौम्य आहे की सत्तेच्या राजकारणात पक्षांतर हा गुन्हा राहिलेलाच नाही, तो एक सोयीस्कर व्यवहार होऊन बसला आहे.

सध्याच्या कायद्यानुसार पक्षांतर करणाऱ्या सदस्याला जास्तीत जास्त शिक्षा काय, तर सभागृहाचे सदस्यत्व रद्द होणे. पण हे सदस्यत्व रद्द होण्यापूर्वीच तो सदस्य मंत्रिपद उपभोगून घेतो, सत्तेतील साधनसंपत्तीचा लाभ घेतो आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होतो. किहोटो होलोहान विरुद्ध झचिल्हू (१९९२) या सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालाने पीठासीन अधिकाऱ्याचा निर्णय हा न्यायाधिकरणाचा निर्णय मानला आणि तो न्यायिक पुनरावलोकनाच्या कक्षेत आणला; पण त्याचवेळी पीठासीन अधिकाऱ्याला किती काळात निर्णय द्यावा, याचे कोणतेही बंधन घातले नाही. याच पळवाटेचा फायदा घेत शिवसेना फुटीच्या याचिकांवर महिनोन् महिने निर्णय लांबवला गेला आणि जेव्हा दिला, तेव्हा तो सत्ताधाऱ्यांच्या बाजूने गेला. न्यायालयीन पुनरावलोकनाचा अधिकार असूनही जर पीठासीन अधिकारीच पक्षपाती वर्तन करत असेल, तर हा कायदा केवळ कागदावरच उरतो. २००३ साली ९१व्या घटनादुरुस्तीने एक तृतीयांश सदस्यांच्या फुटीला संरक्षण देणारी तरतूद रद्द केली खरी, पण दोन तृतीयांश सदस्यांच्या विलीनीकरणाला अजूनही संरक्षण आहे आणि नेमकी हीच तरतूद वापरून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आपापल्या मूळ पक्षांना उभे फोडले, तरीही कायद्याच्या चौकटीत ते वैध ठरले. जो कायदा घोडेबाजार रोखण्यासाठी जन्माला आला, तोच कायदा आज घोडेबाजाराला घटनात्मक संरक्षण देणारे कवच बनला आहे, ही शोकांतिका आहे. या पार्श्वभूमीवर जगातील इतर लोकशाही देशांनी काय केले, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. बांगलादेशने १९७२ सालीच आपल्या राज्यघटनेत अनुच्छेद ७० समाविष्ट केला, ज्यानुसार पक्ष सोडणारा किंवा पक्षाच्या आदेशाविरुद्ध मतदान करणारा सदस्य तत्काळ सदस्यत्व गमावतो, त्याला कोणतीही सवलत किंवा पुनर्विचाराची संधी दिली जात नाही. सिंगापूरच्या राज्यघटनेत अनुच्छेद ४६(२)(ब) अंतर्गत १९६३ सालापासूनच अशी तरतूद आहे की सदस्य ज्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आला, त्या पक्षातून बाहेर पडताच किंवा हकालपट्टी झाल्यास त्याची जागा आपोआप रिक्त होते, यात कोणत्याही न्यायिक विलंबाला थारा नाही.

# गणेशोत्सव मंडळांनी सूचनांचे पालन करावे

## रंजन कुमार शर्मा : कराडला शांतता समितीची बैठक

**कराड (हॅलो न्यूज)**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी डिजे आणि डॉल्बीबाबत प्रशासनाकडून दिलेल्या निर्देशाचे पालन करावे लागणार आहे. प्रशासनाच्या निर्देशाचे पालन केल्यास कोणालाही अडचण होणार नाही. डिजेला पूर्णपणे बंदी असणार नसून त्याच्या डेसिबलची मर्यादा असली पाहिजे, याबाबतची सर्व आदेश असून प्रशासनाच्या सूचनांचे सर्व मंडळांनी पालन करावे व शांततामय आनंदी वातावरणात गणेशोत्सव साजरा करावा, अशा प्रकारचे आवाहन कोल्हापूर परिक्षेत्राचे सध्याचे विशेष पोलिस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांनी केले.




कराडला गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर, पोलिस उपअधीक्षक राजश्री पाटील, कराड शहर पोलिस निरीक्षक दत्तात्रय दराडे, कराड तालुका पोलिस निरीक्षक शीतलकुमार कोल्हाळ, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार कल्पना ढवळे, कराडचे नगराध्यक्ष राजेंद्रसिह यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, मलकापूर नगराध्यक्ष तेजस सोनवणे यांच्यासह कराड व मलकापूरचे सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील म्हणाले की, सातारा जिल्ह्यात सर्व गणेशोत्सव मंडळांनी व गणेशभक्तांनी गणेशोत्सव शांततापूर्ण वातावरणात व आनंदात साजरा करावा. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. यावेळी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे म्हणाले की, गणेशोत्सवात सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाशी यापूर्वी चर्चा केली आहे. प्रशासकडून मंडळांना डॉल्बी वापराबाबत व आवाजाच्या मर्यादेबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. उत्सवावेळी लावल्या जाणाऱ्या स्पीकरमध्ये ज्या ज्या गोष्टी मॉडिफाय केल्या जाणार ते साहित्य जप्त पोलीस प्रशासनाकडून जप्त केले जाणार आहे. वास्तविक मुद्दा हा डीजे किव्हा डॉल्बीचा नसून आवाजाच्या मर्यादेचा आहे. आवाजाची मर्यादा ओलांडल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल हे विसरू नये. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव हा सर्व गणेशोत्सव मांडले प्रशासनाच्या नियमाचे पालन करून साजरा करतील असे पोलिस अधीक्षक पिंगळे यांनी सांगितले.

यावेळी मलकापूरचे नगरसेवक दादा शिंगण यांनी प्रशासन गणेशोत्सव आल्यावरच डॉल्बी व डीजे विरोधात जागे का होते? इतरवेळी का होत नाही. तुकाराम मुंडेंसारखे अधिकारी एका दिवसात टपरी बंद करू शकतात तर मग जिल्ह्यातील अधिकारी, प्रशासन का करू शकत नाही? अशा सवाल शिंगण यांनी यावेळी अधिकाऱ्यांना विचारत डॉल्बी विरोधात सर्व मंडळे सहकार्य करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

मनसेचे शहराध्यक्ष सागर बर्गे, राहुल यादव, माजी नगरसेवक सौरभ पाटील, सागर आमले, कैलास पिसाळ, रणजितनाना पाटील, भूषण जगताप, जयंत बेडेकर, आनंदराव लादे, भाजपचे गटनेते विजय वाटेगावकर , माजी नगरसेविका स्मिता हुलवान, माजी नगरसेवक फारुख पटवेकर यांच्यासह नागरिकांनी यावेळी शांतता समितीच्या बैठकीत चर्चेत प्रश्न उपस्थित करत सहभाग घेतला.

# कराड मर्चंट १०५० कोटीचा व्यवसाय, १२ टक्के लाभांश : सत्यनारायण मिणीयार

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड मर्चंट सहकारी क्रेडीट संस्थेची नुकत्याच संपलेल्या सन २०२५-२६ या अर्थिक वर्षाची ४० वी वार्षीक सर्वसाधारण सभा मर्चट कुटुंब प्रमुख सत्यनारायण मिणीयार यांचे अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी प्रमुख पाहुणे संस्थेचे ज्येष्ठ सभासद चंद्रकांत पवार उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक व स्वागत संचालक डॉ. शरद क्षीरसागर यानी केले. यानंतर विषयाचे वाचन झाले सर्व विषय सर्वानुमते मंजुर झाले.




सभेस मार्गदर्शन करताना संस्थेचे कुटुंब प्रमुख सत्यनारायण मिणीयार यांनी सांगितले संस्थेने नुकत्याच संपलेल्या सन २०२५-२६ या अर्थिक वर्षात गत वर्षीच्या तुलनेत ठेव व कर्जात १७ टक्के ऐवढी प्रशंसनीय वाढ केली असुन संस्थेचा एकत्रित व्यवसाय १०५० कोटी झाला आहे. चालु वर्षी संस्थेने सर्व सभासदांच्या सहकार्याने संस्थेची गुणात्मक वाढ करीत संस्थेकडे ४२५ कोटीची कर्जे वितरीत केली आसुन गत वर्षीच्या तुलनेत वसुली कारवाई व सततचा संपर्क गतिमान ठेवल्याने नक्त एन पी ए शुन्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे. सभासदांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासामुळे मार्च २०२६ अखेर संस्थेच्या ठेवी ५८५ कोटी होत्या आजरोजी त्यामध्ये वाढ होवुन संस्थेच्या ठेवी ६२२ कोटी झाल्या असुन कर्जे ४४० कोटीची आहेत. मागील अर्थिक वर्षात संस्थेला १८ कोटी २३ लाखांचा ढोबळ नफा झाला आहे. संस्थेचे कामकाज विविध २७ शाखातुन सुरु असुन १८ शाखा स्वमालकीच्या जागेत कार्यरत आहेत. मागील अर्थिक वर्षासाठी सभासदांना १२% उच्चांकी लाभांश देत आहोत असे सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे चंद्रकांत पवार यांच्या हस्ते ज्येष्ठ सभासद दिलीप लंगडे काका यांच्या सुविचार संग्रह भाग ३ चे प्रकाशन करणेत आले यानी बोलताना प्रमुख पाहुण्यानी संस्थेच्या स्थापनेपासुनचा जडणघडणीचा अढावा घेतला तसेच मिणीयार साहेबांचे कराड मधील शाहुमहाराजाच्या पुतळा उभारणीत मोलाचे योगदान असुन शाहुमहाराजांच्या कार्यातुन प्रेरणा घेवुन बहुजन हिताय बहुजन सुखाय ची संकल्पना राबवत संस्थेचे काम करत आहेत त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व त्याना दिर्घा युष्य लाभो असे गौरवोद्गार काढले पुस्तक प्रकाशना बाबत श्री. लंगडे यानी क्रतज्ञता व्यक्त केली.

संस्थेच्या चेअरमन सौ. अरुणा चव्हाण यानी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले, संस्थेने सर्व सभासदांच्या सहकार्याने संस्थेची गुणात्मक वाढ करित सभासदानी संस्थेवर दाखविलेल्या अढळ विश्वासामुळे संस्थेस हे यश मिळाले आहे. चालु आर्थिक वर्षात नेहमी प्रमाणे मर्चंट समुहाने आपले सामजिक बांधीलकीचे भान जपत जन्मानंतरचा प्रवाससुखाचा झाला मरणानंतरचा सुध्दा प्रवाससुखाचा व्हावा याहेतुने स्वर्गरथाची संकल्पना राबविलेली आहे तसेच मर्चंट वधुवर सुचक केंद्र सरु झाले असुन, सेवकांच्या हिताचा विचार करुन मर्चंट सेवक पतसंस्थेची हि स्थापना केलेली आहे. बँकीग क्षेत्रात वेगवेगळ्या नवनविन सुविधा उदा. इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, आर टी जीएस, एन ई एफ टी सेवा, लॉकर सुविधा उपलब्ध करुन दिल्या असुन. संपुर्ण शाखा सीबीएस प्रणालीचा अवलंब करित असुन नाविन्य पुर्ण अशी क्युआर कोड सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

यावेळी महिला मर्चेंट सस्थापिका सौ. भारती मिणीयार, संस्थेचे व्हा चेअरमन शिवाजीराव जगताप, संचालक आनंदराव शिंदे, सुरेश पवार, डॉ. मुकुंद लाहोटी, नथमल ओसवाल, वसंतराव हुलवान, किशोर झाड, अरविंद शिंदे, राहुल मिणीयार, भास्करराव पाटील, माणीकराव पाटील, अकाश जाधव, सागर भोंगाळे, सौ. राखी चव्हाण, मॅनेजर अशोक माटेकर उपस्थित होते. शेवटी श्री. अरविंद कलबुर्गी यानी अभार मानले.

# सातारा जिल्ह्यात खरिप पणन हंगाम २०२६-२७ साठी शेतकरी नोंदणी सुरू

**सातारा (हॅलो न्यूज)**

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना खरिप पणन हंगाम २०२६-२७ अंतर्गत सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून धान व भरडधान्य (मका/ज्वारी/बाजरी) खरेदी करण्यासाठीची पूर्वतयारी बैठक मा. जिल्हाधिकारी महोदय, सातारा यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीतील निर्णयानुसार सातारा जिल्ह्यात १ सप्टेंबर २०२६ पासून ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरू करण्यात आली आहे.

**सात खरेदी केंद्रांना मान्यता**

भरडधान्य (मका) खरेदीः ०२ केंद्रांवर ४४८ शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, ३४४ शेतकऱ्यांकडून ९४२७.५० क्विंटल मका खरेदी करण्यात आली व शेतकऱ्यांना २,२६,२६,०००/- रुपये अदा करण्यात आले. नाफेड सोयाबीन खरेदीः ०९ केंद्रांवर ८४२ शेतकरी नोंदणी अंतर्गत, ८१६ शेतकऱ्यांकडून ९७११.०० क्विंटल सोयाबीन खरेदी करून ५,१७,४०,२०८/- रुपये अदा करण्यात आले. नाफेड चना खरेदीः ०९ केंद्रांवर ९० शेतकरी नोंदणी अंतर्गत, ८० शेतकऱ्यांकडून ८७९.०० क्विंटल चना खरेदी करून ५१,६४,१२५/- रुपये अदा करण्यात आले.

मागील हंगामात सुरळीत व विना-तक्रार कार्यरत असलेली २ केंद्रे (फलटण व माण (दहिवडी)) या हंगामातही कायम ठेवण्यात आली असून, शेतकरी वर्गाच्या सोयीसाठी नवीन ५ केंद्रे जोडण्यात आली आहेत. त्यानुसार एकूण ७ केंद्रांवर ही प्रक्रिया पार पडेल.

पूर्वीची कार्यरत २ केंद्रेः फलटण व माण (दहिवडी) नवीन मंजूर ५ केंद्रे सातारा, वाई, मसूर, कोरेगाव व कवठे. शेतक-यांनी मुदतीत आपल्या नजीकच्या अधिकृत केंद्रावर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे.

* Satara * Vol- 15 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# झाडांना राख्या बांधून विद्यार्थ्यांनी केले पर्यावरण संवर्धन

## शिवाजीराव देसाई विद्यालय सोनवडे या माध्यमिक विद्यालयाचा पर्यावरणपूरक उपक्रम

**पाटण (हॅलो न्यूज)**

रक्षाबंधन या सणाच्या निमित्ताने मोरणा शिक्षण प्रसारक मंडळ मरळी संचलित, शिवाजीराव देसाई विद्यालय सोनवडे या माध्यमिक विद्यालयामध्ये झाडांना राख्या बांधून विद्यार्थ्यांनी वृक्षबंधन हा अभिनव उपक्रम राबवून झाडांना राख्या बांधल्या. झाडांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा संदेश देत विद्यार्थ्यांनी पर्यावरणाप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली.

यावेळी विद्यालयांच्या उप शिक्षिका सौ.स्नेहा गोसावी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व व फायदे सांगताना झाडे आपल्याला प्राणवायू देतात, कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, हवेचे प्रदूषण कमी करतात, तापमान नियंत्रित ठेवतात.त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे संरक्षण अत्यंत आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना उदाहरणाद्वारे पटवून दिले.




झाडे लावूया, झाडे जगवूया आणि पर्यावरणाचे रक्षण करूया, माझे विद्यालय हरीत विद्यालय, एक मूल एक झाड, एक पेड माँ के नाम असा संकल्प विद्यार्थ्यांनी यावेळी केला. या पर्यावरण पूरक उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वृक्षप्रेम, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण झाली. असे मत विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.शरद शेजवळ यांनी व्यक्त केले.

# पालकमंत्री शंभूराज देसाई यांचे प्रयत्नातून पाटण तालुक्यातील ५० अंगणवाडया होणार ''स्मार्ट''

**पाटण (हॅलो न्यूज)**

पाटण सारख्या डोंगरी व दुर्गम तालुक्यामध्ये असणाऱ्या अंगणवाड्या मधील विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी मंत्री आदिती तटकरे यांचे महिला व बालविकास विभागाकडे ५० अंगणवाडया हया स्मार्ट अंगणवाड्या मंजूर होण्याकरीता शिफारस केली होती. पाटण तालुक्यातील ५० अंगणवाड्यांना निधी मंजूर झाला असल्याचा शासन निर्णय राज्य शासनाचे महिला व बाल विकास विभागाने पारित केला असून एकाचवेळी पाटण तालुक्यातील ५० अंगणवाड्या या स्मार्ट अंगणवाड्या होणार आहेत.



यामध्ये आंबेघर तर्फ मरळी, आटोली पुनर्वसन, भालेकरवाडी, कोरिवळे २२, सातर, वर्पेवाडी सळवे, मान्याचीवाडी २३०, धनगरवाडा काळगाव २६९, वरचे हेळवाक, किसरुळे बी, काढोली, बाजे मारुल ६४, डोंगरुबाची वाडी ३७९, कवठेकरवाडी, सुभाषनगर २७०, येराडवाडी ३४३, ऊरुल ३३२, डेरवण, माजगाव ३१३, घाणबी, सोनवडे ११०, वाघाचा मळा, आसवलेवाडी, जाधववाडी मेंढ १९२, वरचे घोटील, एकावडेवाडी सळवे, करपेवाडी काळगाव, मस्करवाडी धामणी, ढाणकल मुस्लिमवस्ती, वाघणे, शेळकेवस्ती ६६, चिटेघर २२३, सडादुसाळे, काळेवाडी २६२, पांढरवाडी नाडे २७५, गणेवाडी ३३०, माथणेवाडी चाफळ, खोणोली, जाईचीवाडी, तारळे १५४, कुशी पुनर्वसन ३८०, कोंजवडे १३१, मरळोशी १४२, मोडकवाडी जिंती, सडावाघापूर, आवर्डे १३६, वेखंडवाडी नवीन १७०, जंगमवाडी, चाफळ ३०८ व मराठवाडी या अंगणवाडीचा स्मार्ट अंगणवाडी योजनेमध्ये समावेश आहे.



# जखिणवाडी व कालवडे येथे ८८.५० लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या विशेष प्रयत्नातून जखिणवाडी (ता. कराड) येथे ५६.५० लाख; तर कालवडे येथे ३२ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले.

जखिणवाडी येथे २५ लाखांच्या निधीतून जिल्हा परिषद शाळेची दुरुस्ती केली जाणार आहे. तसेच ९.५० लाख खर्चून संत रोहिदास नगर येथे काँक्रीटीकरण व पेव्हर्स बसविण्याचे काम आणि ७ लाखांच्या निधीतून अंतर्गत रस्त्यांची सुधारणा केली जाणार आहे. याचबरोबर १५ व्या वित्त आयोगातून ८ लाखांच्या निधीतून रस्ता काँक्रीटीकरण केले जाणार आहे. या कामांचे भूमिपूजन आ.डॉ. भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गावात ७ लाखांच्या निधीतून करण्यात आलेल्या अंतर्गत रस्ता सुधारणाचे कामाचे उद्घाटन करण्यात आले.

तसेच कालवडे येथे २५ लाखांच्या निधीतून ग्रामसचिवालय इमारतीचे बांधकाम केले जाणार आहेत. तसेच ७ लाखांच्या निधीतून गावातील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण केले जाणार आहे. या कामांचेही भूमिपूजन आ.डॉ. भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक दयानंद पाटील, कराड पंचायत समितीच्या सभापती नंदाताई यादव, सदस्य अँड. नरेंद्र नांगरे-पाटील, शिवाजीराव थोरात, पै. दादासाहेब थोरात, सरपंच सुदाम मोटे, शुभम थोरात, बालिश थोरात, शोभा नलवडे, शंकर झिंब्रे, मनोहर थोरात, दादासाहेब तडाखे, पै. आप्पासो पाटील, हिंदुराव पाटील, सचिन मोहिते, अशोक पाटील, भास्करराव पाटील, महेश गुरव, अधिकराव पवार, शिवाजी कणसे, पै. श्रीकांत थोरात, हरिश शेठ, शंकर थोरात, पै. धनाजी थोरात, पै. मनोहर थोरात व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते..

# श्रीराम पतसंस्था ग्राहकांच्या विश्वासास पात्र : अमरसिंह पाटणकर

**पाटण (हॅलो न्यूज)**

६० वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करणाऱ्या श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक शिस्त, वेळेत कर्जाची परतफेड, पारदर्शक कारभार आणि सभासदांचा विश्वास कायम ठेवत संस्था ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरली आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेने १५० कोटींचा टप्पा यशस्वीरीत्या पार केला आहे. पुढील काळातही संस्था अधिक सक्षमपणे वाटचाल करेल, यात तीळमात्र शंका नाही, असा विश्वास मार्गदर्शक अमरसिंह पाटणकर यांनी व्यक्त केला.



येथील श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेची ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या भाऊ मोकाशी सभागृहात पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष हिंदुराव सुतार, उपाध्यक्ष सूर्यकांत प्रभाळे, सल्लागार दीपकसिंह पाटणकर, विक्रमसिंह पाटणकर दूध संघाचे अध्यक्ष सुभाषराव पवार, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष अँड. अविनाश जानुगडे, पाटण अर्बन बँकेचे अध्यक्ष चंद्रकांत कापसे, उपाध्यक्ष दिलीपराव मोटे, मुख्यकार्यकारी अधिकारी माधव कपिलेश्वर, मोरणा नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष नथुराम मोरे, संजय हिरवे, दिनकरराव घाडगे, सचिन कुंभार, व्यवस्थापक लहू माने यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी श्री प्रभू रामचंद्रांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अध्यक्ष हिंदुराव सुतार म्हणाले, संस्थेने या आर्थिक वर्षात एकूण व्यवसायाच्या २५२ कोटीचा टप्पा पार केला आहे. तर १४० कोटीच्यावर ठेवी संकलन केल्या आहेत. १७५ कोटी ठेवीचा टप्पा पूर्ण करण्याचा संकल्प आहे. संस्थेचे भाग भांडवल ५ कोटी ६२ लाख १ हजार १०० इतके झाले आहे. राखीव व इतर निधी २२ कोटी ७० लाख ९२ हजार ६८१, ठेवी १४० कोटी ६३ लाख ६७ हजार ५०५ तर निव्वळ नफा १ कोटी ७८ लाख ३५ हजार २०३ रुपये इतका झाला आहे.

दरम्यान याप्रसंगी मार्गदर्शक अमरसिंह पाटणकर यांच्या हस्ते डिजीटल प्रणालीद्वारे सभासदांना १० टक्के डिव्हीडंटचे वाटप एका क्लिकद्वारे करण्यात आले. विलासराव क्षीरसागर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.

# टिळक हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून पंडित मोरे तर उपमुख्याध्यापक म्हणून जयश्री शेंडगे नियुक्त





**कराड (हॅलो न्यूज)**

शिक्षण मंडळ, कराड संचालित टिळक हायस्कूल, कराडच्या मुख्याध्यापक पदी पंडित मोरे तर उपमुख्याध्यापक पदी जयश्री शेंडगे यांची नियुक्ती करण्यात आली.नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन शिक्षण मंडळ, कराडचे अध्यक्ष डॉ. अनिल हुद्देदार, चेअरमन बाळासाहेब कुलकर्णी, व्हाइस चेअरमन अनघा परांडकर, सचिव चंद्रशेखर देशपांडे, सहसचिव राजेंद्र लाटकर, सर्व संचालक, टिळक हायस्कूलचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

# येराड गावच्या १३५ वर्षांपूर्वीच्या जीर्ण व महत्वपूर्ण महसुली अभिलेखांना नवसंजीवनी

**पाटण (हॅलो न्यूज)**

पाटण तालुक्यातील येराड गावच्या तहसील कार्यालयातील रेकॉर्ड रूममध्ये जतन असलेल्या १३५ वर्षांपूर्वीच्या जीर्ण व महत्त्वपूर्ण महसुली अभिलेखांना येराडच्या युवकांच्या पुढाकारामुळे नवसंजीवनी मिळाली आहे. १८९० पासूनच्या जमीन महसूल, जन्म-मृत्यू व अन्य महत्त्वपूर्ण अभिलेखांचे अद्ययावतीकरण करून सात स्वतंत्र रजिस्टर तयार करण्यात आले आहेत. युवकांनी एकत्र येत ग्रामस्थांच्या मदतीने हजारो रुपये गोळा करून हा उपक्रम राबविला. त्यामुळे गावाच्या ऐतिहासिक महसुली दस्तऐवजांचे जतन होणार आहे.

> जीर्ण होत चाललेले अभिलेख म्हणजे केवळ जुने कागद नसून गावाच्या महसुली इतिहासाचे दस्तऐवजी पुरावे आहेत. त्यांचे जतन झाल्याने भविष्यातील पिढ्यांना तसेच विविध महसुली कामकाजासाठी आवश्यक पुरावे उपलब्ध राहतील. एक नोंद म्हणजे विद्यार्थीदशेतील पिढीचा शैक्षणिक दाखला; एक दाखला म्हणजे महसुली सबळ पुरावा; आणि एक सबळ पुरावा म्हणजे अनेक पिढ्यांच्या शिक्षण, प्रमाणपत्रे व नोकरीचा सुकर मार्ग!
> **– अनंत गुरव, तहसीलदार, पाटण.**

तहसील कार्यालयातील रेकॉर्ड रूममध्ये असलेले हे अभिलेख काळाच्या ओघात जीर्ण झाले होते. महत्त्वपूर्ण महसुली दस्तऐवज खराब होऊन नष्ट होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांचे जतन व संवर्धन करण्याची मागणी गावातील युवकांनी महसूल विभागाकडे केली. त्यानंतर युवकांनी लोकवर्गणीच्या माध्यमातून निधी उभारून संबंधित अभिलेखांचे अद्ययावतीकरण करण्याचा उपक्रम राबविला.

या अंतर्गत जुन्या अभिलेखांचे वर्गीकरण करून सात स्वतंत्र अभिलेख तयार करण्यात आले. त्यांचे लॅमिनेशन व बाइंडिंग करण्यात आले असून, भविष्यातील वापरासाठी ते सुरक्षित स्वरूपात तयार करण्यात आले आहेत.



अद्ययावत केलेले हे अभिलेख सोमवारी पाटण तहसील कार्यालयाकडे अधिकृतरीत्या सुपूर्द करत वापरास सुरुवात करण्यात आली.

यावेळी पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोपे, तहसीलदार अनंत गुरव, महसूल सहाय्यक एस. एस. होनकळसे, सदानंद साळुंखे, वाय. जे. साळुंखे, बळीराम साळुंखे, पी. पी. साळुंखे, निलेश साळुंखे, किरण साळुंखे, दत्ता साळुंखे, योगेश साळुंखे, वैभव साळुंखे, गणेश जंगम, अक्षय साळुंखे यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कराडच्या सहापदरी उड्डाणपुलाखाली सुशोभीकरणाला प्रारंभ

**कराड (हॅलो न्यूज)**

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत असलेल्या सहापदरी उड्डाणपुलाखाली सुशोभीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. उड्डाणपुलाखालून शहरात ये-जा करणाऱ्या वाहनांसाठी दोन स्वतंत्र मार्ग तयार करण्यात येत असून, त्यामुळे वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

जाणाऱ्या प्रमुख मार्गांवरील वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेऊन सहापदरी उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे. उड्डाणपुलामुळे मुख्य वाहतूक मार्गावरील कोंडी कमी होण्यास मदत होत असतानाच, पुलाखालून शहरात येणाऱ्या आणि शहरातून बाहेर जाणाऱ्या वाहनांचीही योग्य पद्धतीने व्यवस्था करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

उड्डाणपुलाखालील परिसरात सध्या



सुशोभीकरणाचे काम सुरू असून, उपलब्ध जागेचा नियोजनबद्ध वापर करण्यात येत आहे. शहरात प्रवेश करणाऱ्या आणि शहरातून बाहेर पडणाऱ्या वाहनांसाठी स्वतंत्र मार्ग असल्याने दोन्ही दिशांची वाहतूक एकमेकांना अडथळा ठरणार नाही. परिणामी वाहनचालकांना अधिक सुलभ आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

उड्डाणपुलाखालील परिसराचे सुशोभीकरण झाल्यानंतर या भागाचे स्वरूपही बदलणार आहे. वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबरच परिसराचे सौंदर्य वाढविणे, वाहनांची शिस्तबद्ध ये-जा सुनिश्चित करणे आणि नागरिकांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे, या दृष्टीने हे काम महत्त्वाचे मानले जात आहे.

दरम्यान, सहापदरी उड्डाणपुलाचा पूर्ण क्षमतेने वापर सुरू झाल्यानंतर कराड शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उड्डाणपुलाखालील स्वतंत्र ये-जा मार्ग आणि सुरू असलेले सुशोभीकरण यामुळे शहराच्या प्रवेशद्वाराला अधिक नियोजनबद्ध आणि आकर्षक स्वरूप मिळणार आहे.

### शहर प्रवेशमार्गाची नगराध्यक्षांकडून पाहणी

कराड शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत असलेल्या सहापदरी उड्डाणपुलाखालील शहर प्रवेशमार्गाचा प्रश्न सध्या चर्चेत आला आहे. या मार्गावरून शहरात येणाऱ्या वाहनांची वाढती वर्दळ, वाहतुकीची सुरक्षितता आणि प्रवेशमार्गातील आवश्यक सुधारणा याबाबत नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली.

### परिस्थितीची पाहणी

सहापदरी उड्डाणपुलामुळे शहरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होत असली, तरी उड्डाणपुलाखालून शहरात येणाऱ्या वाहनांसाठी असलेल्या प्रवेशमार्गाच्या रचनेबाबत नागरिकांकडून विविध सूचना मांडल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन परिस्थितीची पाहणी केली.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी व्हावे

## जिल्ह्यातील मंडळांना ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**सातारा (हॅलो न्यूज)**

सन २०२६ चा गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत असून, उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सातारा जिल्ह्यातील अधिकाधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी धर्मादाय आयुक्त, स्थानिक पोलीस अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची आवश्यक परवानगी घेतलेली नोंदणीकृत अथवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे पात्र असतील.

पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या पोर्टलवर दि. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे.

राज्यातील पहिल्या तीन विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

प्रथम क्रमांक ७.५० लाख, द्वितीय क्रमांक ५ लाख, तृतीय क्रमांक २.५० लाख याशिवाय जिल्हास्तरीय समितीमार्फत निवड झालेल्या जिल्ह्यातील प्रथम तीन क्रमांकाच्या मंडळांनाही पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. प्रथम क्रमांक ५० हजार, द्वितीय क्रमांक ४० हजार, तृतीय क्रमांक ३० हजार रूपये.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, सांस्कृतिक परंपरांचे जतन, पर्यावरणपूरक उपक्रम, सामाजिक सलोखा आणि समाजोपयोगी उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत सातारा जिल्ह्यातील अधिकाधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी होऊन आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# जलशुद्धीकरण केंद्रातील चोरीकडे पालिकेचे दुर्लक्ष

## चोरी होऊनही पोलिसात तक्रार नाही, प्रशासन नक्की कोणाला वाचवतं : प्रकरण दाबण्याचा प्रकार

**कराड (हॅलो न्यूज)**

कराडच्या जलशुद्धीकरण केंद्र परिसरातील जुन्या जॅकवेलमध्ये चोरी झाल्याचा प्रकार समोर आला आहे. चोरट्यांनी जॅकवेलमधील ५० एचपी मोटर सेटसह स्टार्टर सेट, कॅपॅसिटर, पॅनल सेट, कनेक्शन फिटिंग तसेच केबल वायर असा मोठ्या प्रमाणात विद्युत साहित्य लंपास केले आहे. या चोरीबाबत विरोधकांनी आवाज उठवला आहे, त्याबाबतचे निवेदन दिले आहे. मात्र, प्रशासनाने १५ दिवसापूर्वीच चोरी होवूनही का दुर्लक्ष केले असा सवाल उपस्थित होत आहे.



गेल्या १५ दिवसापूर्वी चोरी होवूनही प्रशासनाने तक्रार का केली नाही?. नक्की प्रशासन कोणाला वाचवतंय का?, पालिकेच्या प्रशासनाला या चोरीचे गांभीर्य नाही का? विरोधी नगरसेवकांनी आवाज उठवला नसता तर प्रशासन प्रकरण दाबणार होते का? असे अनेक प्रश्न आता सामान्य नागरिकांच्यातून उपस्थित होवू लागले आहेत. तेव्हा गोलमाल है भाई गोलमाल अशीच परिस्थिती सद्यातरी कराड पालिकेच्या कारभारात दिसत आहे.

या चोरीच्या घटनेची माहिती मिळताच कराडमधील भाजपच्या नगरसेवकांनी घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी जॅकवेलची पाहणी करून चोरी झालेल्या साहित्याची माहिती घेण्यात आली. चोरटे खिडकीतून जॅकवेलमध्ये प्रवेश करून आतमध्ये असलेले साहित्य चोरून घेऊन गेल्याचे तेथील कारागिराने नगरसेवकांना सांगितले.

या घटनेमुळे जलशुद्धीकरण केंद्राच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, चोरीचा तपास करून संबंधित चोरट्यांचा तातडीने शोध घेण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी कराड नगरपालिकेचे विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विजय वाटेगावकर, आशुतोष डुबल, सुमित जाधव, गणेश पवार, शिवाजी पवार, अतुल शिंदे आणि अजय पावसकर उपस्थित होते. सदरची चोरी झाल्यानंतर आतातरी प्रशासनाने सीसीटीव्ही बसवावेत, अशी मागणी विरोधी नगरसेवकांनी केली आहे.

# उद्योजक सुनिल बामणे यांच्यावर वाढदिनी शुभेच्छांचा वर्षाव







## जिल्हा परिषद शाळांना स्पोर्टचे साहित्य वाटप

**कराड (हॅलो न्यूज)**

जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी गुणवंत असून त्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजातील दानशूर लोकांनी ग्रामीण भागातील शाळांना सामाजिक भावनेतून मदत करणे गरजेचे आहे. उद्योजक असलेले सुनिल बामणे यांनी नेहमीच सामाजिक भावनेतून सुपने-तांबवे परिसरासह गरजूंना मदतीचा हात दिला आहे. याच भावनेतून आज स्पोर्टसचे साहित्य वाटप करण्यात येत असल्याचे केसे गावचे सरपंच प्रदिप शिंदे यांनी सांगितले.

उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते सुनिल बामणे यांनी वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद शाळांना क्रिकेटचे साहित्य, फुटबॉल आणि खाऊ वाटप करण्यात आले. तांबवे- सुपने भागातील पाठरवाडी, डेळेवाडी, उत्तर तांबवे, साजूर, गमेवाडी, म्होप्रे, पश्चिम सुपने, केसे, विजयनगर, तांबवे व दक्षिण तांबवे शाळेत साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य धनंजय उर्फ रवी ताटे, उद्योजक सुनिल बामणे, सरपंच प्रदिप शिंदे, माजी सरपंच आबासाहेब पवार यांच्या हस्ते साहित्य शाळांना सुपूर्द करण्यात आले. पाठरवाडी येथे उदय यादव, हणमंत यादव, अशोक यादव, यश यादव, गणेश यादव, तांबवे येथे केंद्रप्रमुख आनंदा धायगुडे, पोलिस पाटील शशिकांत चव्हाण, मुख्याध्यापक अमित फल्ले, भाऊसाहेब धायगुडे, साजूर येथे उपसरपंच संदिप पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष बलराज चव्हाण, मुख्याध्यापक पांडुरंग माने, म्होप्रे येथे वसंत शिंदे, विकास संकपाळ, गमेवाडीचे माजी सरपंच भास्करराव यादव, शैलेश शिंदे, हिम्मतराव देसाई, डेळेवाडीचे माजी सरपंच तात्यासाहेब बाबर, काशिनाथ बाबर, विद्यमान सरपंच सौ. बाबर, केसे येथे उपसरपंच तटामुक्ती अध्यक्ष जयसिंग शिंदे, शिवाजीराव शिंदे, सुनिल पाटील, अशोक शिंदे, दिपक पाटील, तांबवे येथे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर पाटील, निलेश भोसले, मुख्याध्यापक श्री. काटकर सर, माजी सरपंच आनंदराव ताटे, कलाकार वासू पाटील, दक्षिण तांबवे येथील शाळेत व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश मोगरे, विलास पाटील, मुख्याध्यापक आबासाहेब साठे आदी उपस्थित होते.

